नियमीत फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- कृष्णा
नि.क्र. १४ खाली .

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - अमित विश्वपाल खोब्रागडे,
वय २६ वर्षे, व्यवसाय – चालक,
राहणार – धामनगाव विद्यामंदीर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो तो आज कोर्टात हजर आहे. घटना दि.०३.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० ते ३.३० वा. दरम्यान धामणगाव विद्यामंदीर येथील विहाराजवळ घडली होती. त्यावेळी मी गणेश याची दुचाकी चालवत होतो त्यावेळी माझ्याकडून गाडीचा क्लच अचानक सूटला त्यामुळे गाडी उचकली. तेव्हा त्याने मला शिवीगाळ केली. त्यावेळी कृष्णा हा तिथे आला व त्याने गणेश याला मारहाण केली. त्यानंतर पोलीसांनी मला पंचनाम्याकरिता बोलाविले होते. त्याकरिता मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांनी माझ्या समक्ष कारवाई केली. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.
सर तपास संपला.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

२. धामणगाव लहान गाव आहे. त्यामुळे गावात कुठलीही घटना घडल्यास त्याची माहिती होऊन जाते. आरोपी माझा मामाचा मुलगा आहे. आरोपीच्या पत्नीचे नाव मनिषा आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीची पत्नी मनिषा व फिर्यादी यांच्या संदर्भात गावामध्ये तंटामुक्तीची सभा झाली होती. हे मला माहीत नाही की, ती सभा पोलीस पाटील प्रमोद गणविर व तंटामुक्ती अध्यक्ष मानिक चौधरी यांनी घेतली होती. हे मला

माहीत आहे की, आरोपी व फिर्यादीमध्ये घटनेपूर्वीपासून बोलणे चालणे बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादीमध्ये आरोपीच्या पत्नीसोबत फिर्यादीच्या असलेल्या प्रेम प्रकरणामुळे बोलणे चालणे बंद आहे. हे मला माहीत नाही की, फिर्यादीने आरोपीची पत्नी व त्याचा फोटो वायरल केला होता. फिर्यादी माझा मित्र व भाऊ लागतो. हे मला माहीत नाही की, फिर्यादीला दारु पिण्याचा शौक आहे. पोलीसांनी माझा बयान घेतला होता. पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली तेव्हा सही घेतली. पोलीसांनी एकाचवेळी माझी सही घेतली होती. मी पोलीसांना बयान देताना गाडी चालवत असताना क्लच सुटला ही बाब सांगितली होती. तसे माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडी उचकल्यामुळे गणेश खाली पडला होता. माझी गाडी खाली पडली नव्हती. मी पोलीसांना बयान देताना घटना बौद्ध विहाराजवळ घडली होती असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला व फिर्यादीला दारु पिण्याचा शौक आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत दिवशी मी दुचाकी चालवत नव्हतो व आरोपीने फिर्यादीला मारहाण केली नव्हती. मी आज फिर्यादीसोबत आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आज फिर्यादीने कशी साक्ष द्यायची हे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक - २०.०६.२०२५